महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२१-२२/२०२२/ 586 दिनांक : ०४.०२.२०२२

**महत्वाचे परिपत्रक** 08 FEB 2022

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत.. **(मुदतवाढ)**

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४५६ दि १७.११.२०२१.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/४८९ दि २०.१२.२०२१.
३) या विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२१-२२/२०२१/५८३० दि. २७.१२.२१.
४) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/१८ दि ०३.०२.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता, महाडीबीटी पोर्टल दिनांक ०३.१२.२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ३ मधील परिपत्रकान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी Institute Profile अद्ययावत करण्याबाबत व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज अंतिम मुदत दि. ३१.०१.२०२२ पर्यंत भरुन घेऊन संस्थांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन प्रलंबित न ठेवता पुढे पाठवण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**महाडीबीटी पोर्टलवर प्रदर्शित केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज (Fresh/Renewal) भरण्यासाठी तसेच, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent Back अंतर्गत आहेत अशा विद्यार्थ्यांना देखील दिनांक २८.०२.२०२२ पर्यंत Re-apply करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेला नाही अशा पात्र विद्यार्थ्यांकडून दिलेल्या वाढीव मुदतीच्या आत अर्ज भरुन घ्यावेत. जर पात्र विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत जोडलेल्या दिनांक ०२.०२.२०२२ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या संस्थ्यांमधील एकत्रित प्रलंबित अर्जांची स्थिती खालीलप्रमाणे असून, संबंधित संस्थांच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध आहे. तरी संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित अर्ज निकाली काढावेत जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

| अ.क्र. | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | विद्यार्थी अर्ज संख्या | संस्थेने मुदतीच्या आत करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज. | ७९,९७८ | संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन निकाली काढावेत **अन्यथा मुदतीनंतर संस्था स्तरांवर प्रलंबित अर्ज सिस्टिमद्वारे रद्द करण्यात येतील** व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुख यांची राहील. तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर (Reject) करावे. |

| अ.क्र. | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | विद्यार्थी अर्ज संख्या | संस्थेने मुदतीच्या आत करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| २. | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent Back अंतर्गत असलेले अर्ज) | २,६०९ | संस्थांनी विद्यार्थ्यांना अर्जाची त्रुटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेऊन अंतिम मुदतीच्या आत निकाली काढण्यात यावे अन्यथा सिस्टिमद्वारे सदर अर्ज रद्द करण्यात येतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी व संस्था प्रमुख यांची राहील. |

**महत्वाची सूचना:**

१. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या (MahaDBT Portal) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

२. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

३. जर संबंधित शिष्यवृत्ती योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता करत नसतानाही विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेकडून मंजूर करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास याबाबत संस्था प्राचार्यांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : महाडीबीटी पोर्टलवरील तारखेचा तक्ता.

प्रत :

१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीस्तव.

२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.

Skip To Main Content | Skip To Navigation | Home | A+ | A= | A- | मराठी

आपले सरकार महाDBT

Shri Uddhav Thackeray
Hon'ble Chief Minister
Maharashtra State

How to Apply Online ? | Benefit Schemes | Post Matric Scholarship | Pre Matric Scholarship | Pension Schemes | Farmer Schemes | Labour Schemes | Special Assistance Schemes

Application Acceptance (New/Ren

इंडिया पोस्ट पेमेन्ट्स बैंक — India Post Payments Bank

Guidelines for Aadhaar linking to bank account

Guidelines on Benefit Disbursement

Guidelines for Courses Not Visible, Missing

Notice

Attention!!!

- Application Acceptance (New/Renewal) for A.Y. 21-22 has been commenced. Last date for Application Acceptance (New/Renewal) for A.Y. 21-22 is 28th February 2022.
- Application Re-apply has been extended for A.Y. 20-21 till 28th February 2022
- Application Acceptance Date for Govt. Of India Post Matric ... Scheduled Caste for A.Y. 21-22 has been commenced. Last date for Renewal Application Acceptance is 15th February 2022 and for New Application Acceptance is 15th February 2022

## Login

Applicant Login Here

Enter UserName

********

YMUUW

Refresh

Enter the text shown in image

Login Here | Forgot Password | Forgot Username

### Instructions

- Enter your registered username
- Enter your Password
- Enter the security text shown in the image
- After confirm login password and security text click on **Login Here** button for login
- Click on Forgot Password, if you forgot your password entered while registration
- Click on Forgot UserName, if you forgot your UserName entered while registration

Integrated with Digital Locker
DigiLocker
Your documents anytime, anywhere

New Applicant Registration

Applicant Login

Institute / Dept / DDO Login

Grievance / Suggestions

User Manuals

- Help file for Online Application Process
- Pop Up Blocker Guidance
- Forgot Password
- Forgot Username
- Aadhaar seeding with NPCI mapping form New
- Check for Bank Aadhaar Mapping Process New
- Instruction for Croping Photo and Signature